अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# २०१४ मधले खग्रास सत्ताग्रहण कोणासाठी

अनेकांना येणारे वर्ष कसे असेल याची खूप उत्सुकता आहे. परंतु काळाच्या गर्भात काय काय दडलेले आहे हे जरी सांगता येत नसले तरी काळाला बदनाम करणाऱ्या अनेक घटना घडण्याची, शक्यता नाकारता येत नाही. इतर कोणत्याही गोष्टींबाबातचे भवितव्य जरी वर्तवता येत नसले तरी २०१४ हे वर्ष राजकारणग्रस्त असेल यात काहीही शंका नाही. ज्याप्रमाणे खगोलीय गणितांप्रमाणे वर्षभरात किती सूर्यग्रहणे, किती चंद्रग्रहणे असतील हे हमखासपणे सांगता येते. त्यातली किती खग्रास आहेत, किती खंडग्रास आहेत याचेही वेळापत्रक सांगता येते. अशाच राजकीय ग्रहणांचे योग या वर्षभरात आले आहेत. काही राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभा निवडणूक अशा दोन राजकीय ग्रहणांचे योग वर्षभरात आहेत. राजकारणात खग्रास आणि खंडग्रास असा प्रकार असू शकत नाही. परंतु, तरीसुद्धा येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याच पक्षात बहुमत मिळण्याची शक्यता वाढत नाही. परंतु केंद्रात काँग्रेसचे सरकार पुन्हा सत्तेवर येण्याची फारच धूसर चिन्हे आहेत. म्हणूनच काँग्रेससाठी हे वर्ष खग्रास म्हणजे या पक्षाला पराभवाने झाकोळून टाकणाऱ्या ग्रहणासारखे ठरू शकेल तर भारतीय जनता पार्टीला बहुमतापासून काही अंतर दूर ठेवणारे हे निवडणूक वर्ष ठरणार असल्याने या पक्षासाठी ते खंडग्रास ग्रहणासारखे ठरण्याची शक्यता आहे. बाकी इतर पक्षांची अवस्था देखील फारशी वेगळी नाही. बहुमतांची प्रत्येकाला अपेक्षा असली तरी परिस्थिती तशी नसल्याने इतर पक्षांसाठी निवडणूक वर्ष खंडग्रास ग्रहणाप्रमाणे ठरू शकते, अशी सगळी राजकारणग्रस्तता हे या २०१४ चे वैशिष्ट ठरेल. त्यात सामान्य माणसाच्या वाटेला जी काही एक राजकीय व्यवस्थेतली अनुकूलता यायला हवी ती येण्याची शक्यताही फारशी दिसत नाही. रिझर्व बँकेच्या गव्हर्नरांनीसुद्धा येणाऱ्या वर्षाच्या राजकीय परिस्थितीचा अंदाज घेतलेला दिसतो आणि म्हणून त्यांनी राजकीय स्थिरताच विकास घडविण्यासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन नुकतेच केले आहे. ज्याअर्थी देशाच्या सर्वात महत्त्वाच्या मध्यवर्ती बँकेच्या प्रमुखाला येणाऱ्या वर्षाची राजकीय चाहूल लागावी आणि त्यांनी राजकीय स्थैर्याचे महत्त्व जाणून-बूजून मांडावे याचाच अर्थ अशा प्रकारचे स्थैर्य भारतातला कोणताच राजकीय पक्ष देण्याच्या स्थितीत नाही हेही स्पष्ट होते.

## नुसते डॉक्युमेंट नको, व्हिजन हवे

भारतीय जनता पक्षाने नरेंद्र मोदी यांना आपले पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून घोषित केले. गुजरातच्या विकासाच्या मुद्‌द्यावर त्यांनी आगामी लोकसभा निवडणूक विकासाच्याच मुद्‌द्यांवर लढविण्याची तयारीही सुरू केली. सध्या देशभर विकास आणि भ्रष्टाचार निर्मूलन या दोन मुद्‌द्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यासाठी मोठ-मोठी आश्वासने निवडणुकीच्या निमित्ताने दिलीही जातील. परंतु त्याची पूर्तता करण्याची प्रिंट आज एकाही राजकीय पक्षाकडे नाही ही वस्तुचित्र आहे. नरेंद्र मोदींनी विकास घडविला. त्यातून गुजरातकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलला. गोध्रा दंगलीमुळे काळा डाग बसलेल्या गुजरात विषयी आणि तिथे सत्तेत असलेल्या भाजपाविषयी लोकांच्या मनात विश्वास नव्हता. ही परिस्थिती बदलून मोदी यांनी विकासाचे एक मॉडेल मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आता फक्त हेच राज्य स्तरावरचे मॉडेल देश पातळीवर लागू करण्याचे फार मोठे काम त्यांना करावे लागणार आहे. भाजपाने आता केवळ वल्गना आणि घोषणा न करता प्रत्यक्ष कृती करून दाखवली पाहिजे. विकासाचे व्हिजन डॉक्युमेंट पक्ष तयार करीत असल्याचे मध्यंतरी या पक्षाच्या नेत्यांनी जाहीर केले. परंतु केवळ डॉक्युमेंट केले म्हणजे काम संपत नाही, तर ते डॉक्युमेंट प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे व्हिजन लागते. ते आज दिल्लीत 'आम आदमी पार्टी' च्या नेत्यांनी करून दाखविले. छोट्या प्रमाणात का होईना, परंतु विकासाविषयी आणि सामान्य माणसाच्या अपेक्षांची पूर्तता कशी करता येईल या दिशेने 'आम आदमी पार्टी'ने काही ठोस पावले टाकून दिशा दाखवण्याचे काम केले आहे. मोदींची प्रतिमा उभी करताना विकासाची प्रत्यक्ष चौकटही तेवढीच अनिवार्य आहे. तरच या सत्ता प्राप्तीच्या खंडग्रास ग्रहणापासून भाजपाची थोडीफार सुटका होईल.

## २०१४ मधले चौदावे रत्न कोणते

आगामी वर्षाच्या या राजकारणग्रस्ततेत सर्वात जास्त तारांबळ काँग्रेसची होणार आहे. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविणे म्हणजे लढाईपूर्वीच हार स्वीकारण्यासारखे ठरणार आहे. याची तीव्र जाणीव झाल्यामुळेच आता राहुल गांधींची प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न काँग्रेस युद्धपातळीवर करीत आहे. आम्ही गेल्याच महिन्यात मनमोहन सिंगांचे पंतप्रधानपदाचे शेवटचे शंभर दिवस अशा मथळ्याचा मजकूर लिहिला होता. आता त्याच दिशेने यांची वाटचाल सुरू आहे. येत्या काही दिवसात ते स्वत:च काँग्रेसचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून राहुल गांधींचे नाव जाहीर करतील. विद्यमान पंतप्रधान असलेल्या व्यक्तीने राहुल गांधींचे नाव घोषित करण्यामागे राजकीय डावपेच आहे. कारण राहुल गांधी यांचे नाव सोनिया गांधी जाहीर करू शकत नाहीत. त्या जरी पक्षाध्यक्ष असल्यातरी आपल्याच मुलाचे नाव जाहीर करण्याचे वेगळे राजकीय परिणाम घडू शकतात. आजमितीला काँग्रेसमध्ये राहुल गांधींचे नाव जाहीर करण्यासाठी एकही योग्य व्यक्ती नाही. अगदी चिदंबरम् यांच्यापासून ते ए.के.अँटोनी यांच्यापर्यंत कोणीही राहुल यांचे नाव जाहीर केले तर त्याचा काहीच प्रभाव पडणार नाही सध्या तर नरेंद्र मोदींनी जाहीर सभांचा सपाटा सुरू केला आहे. 'आम आदमी पार्टी'ने देशभर उमेदवार उभे करण्याची मोहीम आखली आहे. अशा वेगवान घडामोडीत काँग्रेसने जर आपला उमेदवार घोषित केला नाही तर त्याची राजकीय किंमत मोजावी लागू शकते. म्हणजेच आगामी वर्षात सत्ता मिळविण्याची शक्यता धूसर असताना किंवा सत्ता सूर्यासाठी खग्रास ग्रहण असताना काँग्रेसला त्याची जाणीव होणे गरजेचे ठरते. अशा या सत्तासंघर्षाच्या साठमारीत आगामी वर्ष ढवळून निघेल २०१४ साली सत्तामंथनातून कोणते १४ वे रत्न भारताच्या राजकीय क्षितिजावर येईल हे सांगणे कठीण होत आहे.